**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

विकास योजना ताथवडे (पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) महानगरपालिका हद्दीतील मुंबई-बेंगलोर ६०.० मी. रस्त्याच्यालगत दोन्ही बाजूने १२.० मी. सेवा रस्ता प्रस्तावित करणेबाबत आणि लगतच्या आरक्षणांच्या हद्दीमध्ये / क्षेत्रामध्ये बदल करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(२) अन्वये मंजूरीची अधिसूचना...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक - टिपीएस-१८२०/२७८/प्र.क्र.७३/२०२२/नवि-१३**
**दिनांक :२८.०७.२०२२**

**निर्णय** : सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुणे विभागीय पुरवणी भाग एक मध्ये प्रसिध्द करावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

KISHOR VISHNU GOKHALE

Digitally signed by KISHOR VISHNU GOKHALE
DN: CN = KISHOR VISHNU GOKHALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2022.07.29 11:31:23 +05'30'

**(किशोर वि. गोखले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उप सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/- सदरची अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

३. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

४. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, जि. पुणे.

/- सदर अधिसूचनेतील मंजूर प्रस्तावानुसार फेरबदल दर्शविणारे नकाशे अधिप्रमाणित करण्यासाठी ५ प्रतींमध्ये विहितमार्गाने शासनास सादर करण्यात यावेत.

५. जिल्हाधिकारी, पुणे.

६. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

७. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

/-सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन तिच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास व उपरोक्त कार्यालयांना पाठवाव्यात, ही विनंती.

८. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर अधिसूचना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

१०. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

११. निवडनस्ती (नवि-१३).

*********

# <u>अधिसूचना</u>

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**

**मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक:२८.०७.२०२२**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्रमांक-टिपीएस-१८२०/२७८/प्र.क्र.७३/२०२२/नवि-१३:-** ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ताथवडे गावाची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त विकास योजना' असा करण्यात आला आहे) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आला आहे) चे कलम-३१(१) अन्वये अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/वि.यो.मंजुरी/नवि-१३, दि.०६.०१.२०१७ अन्वये भागश: मंजूर केली असून वगळलेल्या भागाची विकास योजना अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/ई.पी.मंजुरी/नवि-१३, दि.०३.१०.२०१८ अन्वये (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) मंजुर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेनुसार, मुंबई-बेंगलोर ६० मी. रुंद रस्त्याच्या पुर्वेस भागश: ग्रीन बेल्ट, रहिवास विभाग, औद्योगिक विभाग, सार्वजनिक-निमसार्वजनिक विभाग आ.क्र.४३ 'पार्किंग' व विकास योजना रस्ते इ. प्रस्ताव असून रस्त्याच्या पश्चिमेस भागश: रहिवास विभाग, औद्योगिक विभाग, वाणिज्य विभाग, आ.क्र. २३ व २४ 'बस टर्मिनस व पार्किंग', आ.क्र.३० 'पोलिस चौकी', सार्वजनिक-निमसार्वजनिक विभाग व विकास योजना रस्ते इ. प्रस्ताव आहेत;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सभेने ठराव क्र.२६३, दि.०६.०९.२०१८ अन्वये उक्त विकास योजनेमधील मुंबई-बेंगलोर ६० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूने १२ मी. सेवा रस्ता प्रस्तावित करण्यास आणि प्रसिध्द भाग नकाशामध्ये दर्शविल्यानुसार आरक्षण क्र.३० 'पोलिस चौकी', स.क्र.१३०, स.क्र.१३१ पै. मधील आरक्षण क्र.२३, २४ 'बस टर्मिनस व पार्किंग' आणि आरक्षण क्र.४३ 'पार्किंग' यांचे हद्दीमध्ये बदल करणेबाबत फेरबदलाची कार्यवाही (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेखिलेला) करण्याचे ठरविले आहे;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन उक्त विकास योजनेत उक्त फेरबदल प्रस्तावित करुन सदर फेरबदलाचा प्रस्ताव दि.२४.०१.२०२० चे पत्र क्र.नरवि/कावि/०६/८०/२०१९ अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला-मसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(२) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासन याद्वारे उक्त फेरबदल प्रस्ताव मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेत खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर खाली दिलेली नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे:-

***"नोंद"***

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे ताथवडे गावाच्या मंजूर विकास योजनेमध्ये, सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मुंबई-बेंगलोर ६० मी. रुंद रस्त्यालगत दोन्ही बाजूने १२.० मी. सेवा रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच आरक्षण क्र.३० "पोलिस चौकी" या आरक्षणाचे हद्दीमध्ये आणि आरक्षण क्र.२३, २४ "बस टर्मिनस व पार्किंग" आणि आरक्षण क्र.४३ "पार्किंग" यांचे क्षेत्रामध्ये बदल करण्यात येत आहे."

**१)** सदरहू फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा क्र.टिपीएस-१८२०/२७८/प्र.क्र.७३/२०२२/नवि-१३ जनतेच्या अवलोकनार्थ आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

**२)** सदरहू अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

KISHOR VISHNU GOKHALE

Digitally signed by KISHOR VISHNU GOKHALE
DN: CN = KISHOR VISHNU GOKHALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2022.07.29 11:31:48 +05'30'

**(किशोर वि. गोखले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# NOTIFICATION

**Government of Maharashtra**
**Urban Development Department**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**
**Date:28.07.2022**

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966***

**No.TPS-1820/278/C.R.73/2022/UD-13 :-** Whereas, the Development Plan of Tathawade village of Pimpri-Chinchwad Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Development Plan") has been partly sanctioned by the Government in Urban Development Department under section 31*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as the "said Act") *vide* Notification No.TPS-1815/2012/CR-84/D.P. Sanction/UD-13, dt.06.01.2017 and Development Plan of Excluded Parts has been sanctioned *vide* Notification No.TPS-1815/2012/CR-84/E.P.Sanction/UD-13, dt.03.10.2018 (hereinafter referred to as "the said Notifications");

And whereas, as per the said Development Plan, on the east side of 60 mtr. wide Mumbai-Bengaluru road, partly Green Belt, Residential Zone, Industrial Zone, Public Semi Public Zone, Reservation No.43 'Parking' & Development Plan Road etc. are proposed and on the west side of 60 mtr. wide Mumbai-Bengaluru road, partly Residential Zone, Indstrial Zone, Commercial Zone, Reservation No.23, 24 'Bus Terminus & Parking', Reservation No.30 'Police Station', Public-Semi Public Zone and Development Plan Road etc are proposed;

And whereas, the Pimpri-Chinchwad Municipal Corporation has decided vide their General Body Resolution No.263, dated 06.09.2018 to propose 12 mtr. service road along both sides of 60 mtr. wide Mumbai-Bengaluru road along with the changes in the boundries of Reservation No.30 'Police Station', Reservation No.23, 24 'Bus Terminus & Parking' in S.No.130, 131 (pt). and Reservation No.43 'Parking' as shown on published part plan (hereinafter referred to as "the said modification proposal ") in the said Development Plan;

And whereas, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, after following all legal procedure laid down under the provision of section 37*(1)* of the said Act, submitted the said modification proposal to the Government vide it's Marathi letter No. क्र.नरवि/कावि/०६/८०/२०१९, dated 24.01.2020 for sanction;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of opinion that, the said modification proposal needs to be sanctioned;

Now therefore, in exercise of the power conferred by 37(2) of the said Act, Government hereby sanctions the said modification proposal and for that purpose amends the said Notification as follows.

In the schedule of modifications appended to the said notification, after the last entry, following new entry shall the added viz:-

***"ENTRY"***

"The 12 mtr. service road is proposed on both sides of 60 mtr. wide Mumbai-Bengaluru road in the sanctioned Development Plan of Village Tathawade along with the changes in the boundries of Reservation No.30 'Police Station', and changes in the areas of Reservation No.23, 24 'Bus Terminus & Parking' and Reservation No.43 'Parking' as shown on plan."

i) Part Plan bearing No.TPS-1820/278/C.R.73/2022/UD-13 showing the aforesaid sanctioned modification is kept open for inspection of the general public in the working hours on all working days in the office of the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri.

ii) This notification will be available on Govt. web site www.maharashtra.Gov.in (Acts / Rules).

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

KISHOR VISHNU GOKHALE

Digitally signed by KISHOR VISHNU GOKHALE
DN: CN = KISHOR VISHNU GOKHALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2022.07.29 11:32:06 +05'30'

**(Kishor V. Gokhale)**
**Under Secretary to Governmentss**